# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या./ ८४ /२०२१.**
**दिनांक :- ०६ /०४/२०२१.**

**संदर्भ** :- १. भारतीय साथ रोगनियंत्रण अधिनियम,१८९७.

२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५.

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५ आरोग्य – ५, दिनांक १४/०३/२०२०.

४. केंद्र शासन गृह विभागाकडील आदेश क्र. (MHA)/ Order No.४०-३/२०२०-DM-I (A) दि.०१/०५/२०२०, दि. ११/०५/२०२०, दि.१५/०५/२०२०, दि.१७/०५२०२०, दि.२०/०५/२०२०, दि.३०/०५/२०२०, (Unlock-१) दि.२९/०६/२०२० (Unlock-२) दि.२९/०७/२०२० (Unlock-३) दि.२९/०८/२०, (Unlock-४) दि.३०/०९/२० (Unlock-५), दि. २९/१०/२०२०. (Unlock-६).

५. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन. मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.डिएमयू/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि.१५/०३/२०२१ चे आदेश.

६. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन. मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.डिएमयू/ २०२०/प्र.क्र.९२/ डीआयएसएम-१, दि.१७/०३/२०२१.

७. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन. मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.डिएमयू/ २०२०/प्र.क्र.९२/ डीआयएसएम-१, दि.२७/०३/२०२१.

८. पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कडील जा.क्र.वि.शा./कोरोना/मनाई आदेश/१३९६/२०२१, दि . २८/०३/२०२१.

**९. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन. मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.डिएमयू/२०२०/प्र.क्र.९२/ डीआयएसएम-१, दि.०४/०४/२०२१ व दि.०५/०४/२०२१.**

**आदेश:-**

राज्यात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसुन येत आहे. कोव्हिड-१९ चा संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यास्तव कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन शासनाने यापुर्वी वेळोवेळी निर्बंध लागू केलेले आहेत, आणि कोव्हिड-१९ च्या नियंत्रणासाठी आणखी काही निर्बंध लागू करणे आवश्यक असल्याने उपरोक्त संदर्भ क्र.७ च्या अधिसुचनेनुसार राज्यात यापुर्वी लागू करण्यात आलेले आहेत.

**आता, उपरोक्त संदर्भ क्र. ९ च्या शासन आदेशानुसार संपुर्ण राज्यात लागु केलेले निर्बंध दि. ३० एप्रिल,२०२१ पर्यत खालील परिच्छेद क्र. १ ते २१ प्रमाणे निर्बंध भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू आहेत.**

**१. कलम १४४ व नाईट कर्फ्यु लागु असणे :-**

१. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात कलम १४४ लागू असेल.

२. सोमवार ते शुक्रवार सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी ५ पेक्षा जास्त व्यक्तीस जमण्यास परवानगी नसेल.

३. उर्वरित दिवशी ( रात्री ८ ते सकाळी ७ उर्वरित सर्व दिवशी आणि शुक्रवारी रात्री ८ ते सोमवारी सकाळी ७) कोणत्याही व्यक्तीस वैध कारणा शिवाय सार्वजनिक ठिकाणी फिरण्यास परवानगी नसेल.

४. वैद्यकिय व इतर आवश्यक सेवांना सुट देण्यात आली असुन त्यांच्यावर कोणतेही प्रतिबंध नसेल.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी — (ठाणे)

५. अत्यावश्यक सेवेत खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

१. रुग्णालय, डायग्नोस्टिक सेंटर, क्लिनिक, वैद्यकिय विमा कार्यालय, फार्मासिस, फार्मासुटिकल कंपनी व इतर वैद्यकिय व आरोग्य सेवा.
२. किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, दुग्ध शाळा, बेकरी, मिठाई, खाद्य पदार्थाचे दुकाने.
३. सार्वजनिक वाहतुक - रेल्वे, टॅक्सी, ऑटो रिक्षा आणि सार्वजनिक बसेस.
४. भिवंडी महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मान्सुनपुर्व कामे.
५. भिवंडी महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्व सार्वजनिक सेवा.
६. वस्तुची वाहतुक.
७. सर्व कृषी संबंधी सेवा.
८. ई-कॉमर्स.
९. अधिकृत मिडिया.
१०. भिवंडी महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी जाहिर करण्यात येणाऱ्या अत्याश्यक सेवा.

६. दि.०५/०४/२०२१ चे शासन आदेशानुसार खालील सेवांचा अत्यावश्यक सेवामध्ये समावेश करण्यात आला आहे.

१. पेट्रोलपंप आणि पेट्रोलियम संबंधित उत्पादने
२. सर्व प्रकारच्या कार्गो सेवा.
३. डेटा सेंटर, क्लाऊड सर्व्हिसेस प्रोव्हायडर्स, आयटी-माहीती तंत्रज्ञान संबंधित महत्वाच्या पायाभुत सुविधा आणि सेवा.
४. शासकिय व खाजगी सुरक्षा सेवा.
५. फळ विक्रेते.

१. ज्या व्यक्ती रात्री ०८.०० ते सकाळी ७.०० या वेळेत रेल्वे, बसेस, विमाने यातुन आगमन किंवा प्रस्थान करणार असतील त्यांना अधिकृत तिकिट बाळगावे लागेल, जेणेकरुन ते संचारबंदीच्या कालावधीत स्थानकांपर्यंत किंवा घरी प्रवास करु शकतील. (दिनांक ०५/०४/२०२१ चे शासन आदेश)
२. औद्योगिक कामगारांना त्यांच्या ओळखपत्राच्या आधारे रात्री ०८.०० ते सकाळी ७.०० या वेळेत कामाच्या पाळयानुसार ये-जा करता येईल. (दिनांक ०५/०४/२०२१ चे शासन आदेश)
३. परिक्षा केंद्रावर उपस्थित राहून परिक्षा देणा-या विद्यार्थ्यांस रात्री ८.०० नंतर घरी प्रवास करावयचा असल्यास हॉल तिकिट बाळगावे लागेल. (दिनांक ०५/०४/२०२१ चे शासन आदेश)
४. घरगुती काम करणारे कामगार,वाहनचालक, स्वयंपाकी यांच्या रात्री ८ नंतर ये-जा करण्याच्या बाबतीत सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांनी परिस्थितीनुरुप निर्णय घ्यावा. (दिनांक ०५/०४/२०२१ चे शासन आदेश)

**२. बाह्य उपक्रम:-**

१. सर्व बागा, सार्वजनिक मैदाने, हे सोमवार ते शुक्रवार दररोज रात्री ८ ते सकाळी ७ पर्यत बंद राहतील तसेच शुक्रवारी रात्री ८ पासुन ते सोमवारी सकाळी ७ पर्यत बंद राहतील.
२. सोमवार ते शुक्रवार सकाळी ७ ते रात्री ८ पर्यत संबंधितांनी कोव्हिड-१९ बाबत सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.
३. कोव्हिड-१९ चा होणारा प्रादुर्भाव लक्षात घेता वरील सर्व ठिकाणी नियमाचे पालन न केल्यास बागा, सार्वजनिक मैदाने बंद करण्यात येतील.

**३. दुकाने, बाजार पेठ व शॉपिंग मॉल्स् :-**

अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, बाजार पेठ व शॉपिंग मॉल्स् बंद राहतील

१. अत्यावश्यक सेवेतील दुकाने हे सामाजिक अंतर ठेवुन, सुरु राहण्यास परवानगी ओल. एखाद्या दुकानात गर्दी झाल्यास, चिन्हांकित ठिकाणी पुरेसे सामाजिक अंतर ठेवुन प्रतिक्षा रांगेत संबंधितास उभे करण्यात यावे.

२. अत्यावश्यक सेवांच्या दुकानाचे मालक व काम करणाऱ्या सर्व व्यक्तींने भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. ग्राहकांशी संपर्क साधण्यासाठी अत्यावश्यक सेवेमधील सर्व दुकांनाना पारदर्शक काचेच्या व इतर कवच याचा उपयोग करण्यात यावा. तसेच ई- पेमेंटला प्रोत्साहन देण्यात यावे.

३. जे दुकाने सद्यस्थितीत बंद राहणार आहेत, त्या दुकानदार मालकांनी भारत सरकारच्या निकषानुसार सव कामगारांचे लसीकरण करुन घ्यावे तसेच आपली दुकाने पारदर्शक काचेच्या व इतर कवच, ई-पेमेंट यानुसार संबंधीतांनी सुसज्ज करुन ठेवावे, जेणे करुन सदर दुकाने उघडण्याची परवानगी देण्याबाबत शासनास विचार करता येईल.

**४. सार्वजनिक वाहतुक :-**

सार्वजनिक वाहतुक हे खालील प्रतिबंधासह पुर्णपणे चालु राहतील.

| ऑटो रिक्षा | वाहनचालक + दोन प्रवासी. |
|---|---|
| टॅक्सी (चार चाकी) | वाहनचालक + वाहन क्षमतेच्या ५०% प्रवासी. |
| बस | बसण्याच्या क्षमतेच्या सर्व प्रवासी. (उभे राहुन प्रवास करण्यास बंदी असेल) |

१. सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांनी मास्क परिधान करणे बंधनकारक राहील. कोणतेही प्रवासी मास्क व्यक्तिरिक्त आढळल्यास रक्कत रुपये ५००/- दंड आकारण्यात यावा.

२. चार चाकी टॅक्सीमध्ये कोणतेही प्रवासी/वाहनचालक मास्क व्यक्तिरिक्त आढळल्यास रक्कम रु.५००/- दंड आकारण्यात यावा.

३. प्रत्येक यात्रेनंतर वाहने सॅनिटाईज करण्यात यावे.

४. सर्व सार्वजनिक वाहनांचे वाहनचालक व इतर कर्मचारी यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. जो पर्यत लसीकरण होत नाही, तो पर्यंत कोव्हिड-१९ चाचणी निगेटिव्ह असल्याचे प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम दिनांक १० एप्रिल २०२१ पासुन अंमलात आण्यात येईल. तथापी टॅक्सी व ऑटो रिक्षाचालक यांनी स्वत: ला प्लास्टिक शिट अथवा इतर कवच याव्दारे प्रवाशांपासुन विलगीकरण केले असल्यास, त्यांना या बाबत सुट देण्यात येईल.

५. जर वरीलपैकी कोणीही निगेटिव्ह RTPCR प्रमाणपत्र / लसीकरण न झाले असल्याचे आढळल्यास, त्यास रक्कम १०००/- दंड आकारण्यात येईल.

६. बाहेर जाणाऱ्या रेल्वेमध्ये कोणीही उभ्याने प्रवास करणार नाही याची खात्री रेल्वे प्रशासनाने घ्यावी. तसेच सर्व प्रवासी हे मास्क घातले याची खातरजमा करावी.

७. रेल्वेमध्ये कोणाताही प्रवासी मास्क व्यक्तिरिक्त आढळल्यास, रक्कम ५००/- दंड आकारण्यात यावा.

**५. कार्यालये :-**

अ. खालील नमुद कार्यालये वगळता सर्व खाजगी कार्यालय बंद राहतील.

१. सहकारी बॅक ,PSU, खाजगी बॅक.

२. BSE/NSE.

३. विद्युत पुरवठा संबंधित सर्व कंपनी.

४. दुरसंचार सेवा.

५. विमा / मेडिक्लेम कंपनी.

६. उत्पादन व वितरणासाठी लागणारे फार्मास्युटिकल कंपनी.

ब. सर्व शासकिय कार्यालय तसेच शासनाशी संबंधित असलेले विद्युत, पाणी पुरवठा व बँकिंग व इतर वित्तिय सेवा पुर्ण क्षमतेसह कार्यरत राहतील,

क. शासकिय कार्यालयातील सर्व सभा/ बैठक कार्यालयातील कर्मचाऱ्यांशिवाय इतर कोणाशीही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात.

ड. शासकिय कार्यालय तसेच सरकारी कंपन्याचे कार्यालय कर्मचाऱ्यांव्यक्तिरिक्त कोणत्या अभ्यंगतास परवानगी नसेल. या सर्व कार्यालयांनी लवकरात लवकर ई- विजिटर प्रणाली सुरु करण्यात यावी.

इ. शासकिय कार्यालयात अपवादात्मक परिस्थिती असल्यास त्या विभागाचे विभाग प्रमुख हे ४८ तासांच्या आत कोव्हिड-१९ निगेटिव्ह असलेल्या अभ्यंगतास भेटण्यास परवानगी देऊ शकतात.

फ. भारत सरकारच्या निकषानुसार सर्व खाजगी व शासकिय कर्मचाऱ्यांनी लवकरात लवकर लसीकरण करुन घेण्यात यावी. जेणेकरुन शासन उर्वरित कार्यालये कोव्हिड-१९ च्या प्रार्दुभाव किंवा गतीची भिती न बाळगता पुन्हा सुरु करण्याबाबत शासनास विचार करता येईल.

**६. दिनांक ०५/०४/२०२१ च्या शासन आदेशानुसार खालीलप्रमाणे खासगी आस्थापना आणि कार्यालये सकाळी ७ ते रात्री ८ या कालावधीत सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे.**

१. खालील नमुद खासगी आस्थापना आणि कार्यालये सकाळी ७ ते रात्री ८ या कालावधीत सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. मात्र, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, त्यात काम करणा-या कर्मचा-यांचे लसीकरण करावे करावे व जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल, २०२१ पासुन अंमलात येईल आणि नियम तोडणा-या व्यक्तींकडुन रु. १,०००/- दंड आकारण्यात येईल.

a. सेबी तसेच सेबी मान्यताप्राप्त संस्था जसे की स्टॉक मार्केट, डिपॉझिट आणि क्लिअरिंग कॉर्पोरेशन्स

b. रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखालील संस्था, प्राथमिक डीलर्स, सीसीआयएल, एनपीसीआय, पेमेंट सिस्टीम ऑपरेटर्स,

c. सर्व नॉन बँकिंग वित्तीय महामंडळे,

d. सर्व मायक्रो फायनान्स संस्था,

e. सर्व वकिलांची कार्यालये

f. कस्टम हाऊस एजंट्स, परवानाधारक मल्टी मोडल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर ( लस/ औषधी / जीवनरक्षक औषधांशी संबंधित वाहतूक)

**७. खाजगी वाहतुक :-**

खाजगी वाहने ( खाजगी बसेससह ) सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी ७ ते रात्री ८ पर्यत चालु राहतील व फक्त अत्यावश्यक सेवेसाठी शुक्रवारी रात्री ८ ते सोमवारी सकाळी ७ पर्यत कार्यरत राहतील.

**खाजगी बसेस खालील प्रतिबंधासह चालु राहतील.**

१. आसन क्षमतेसह प्रवास करणेस परवानगी असेल. कोणत्याही प्रवाशांना उभे राहुन प्रवास करण्यास प्रतिबंध असेल.

२. केंद्र शासनाच्या निकषानुसार सर्व कर्मचा-यांनी लवकरात लवकर लवकारात लवकर लसीकरण करावे व जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल, २०२१ पासुन अंमलात येईल.

**८. मनोरंजन व करमणुक :-**

१. सर्व सिनेमागृह बंद राहतील.

२. सर्व नाटगृह व सभागृह बंद राहतील.

३. सर्व करमणुक पार्क/ आर्केड/विडिओ गेम पार्लर बंद राहतील.

४. सर्व क्लब, जलतरण तलाव, जिम, व क्रिडा संकुल बंद राहतील.

५. भारत सरकारच्या निकषानुसार या सर्व आस्थापनाशी संबंधित व्यक्तिनी लवकरात लवकर लसीकरण करुन घेणे. जेणे करुन कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भाव किवा गतीची भिती न बाळगता ही सर्व आस्थापने पुन्हा सुरु करण्याबाबत शासनास विचार करता येईल.

**९. रेस्टॉरंट्स, बार, हॉटेल्स.**

१. कॅम्पसमधील व हॉटेलमधील अविभाज्य भाग वगळता सर्व रेस्टॉरंट्स, बार बंद राहतील

२. सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी ७ ते रात्री ८ या दरम्यान फक्त टेक अवे, पार्सल, होम डिलिव्हरी यांस परवानगी असेल. शनिवार आणि रविवार सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत फक्त होम डिलीव्हरी साठी परवानगी असेल.

३. हॉटेल्समधील रेस्टॉरंट्स व बार हे फक्त हॉटेलमधील पाहुण्यांसाठी खुले ठेवण्यास परवानगी असेल. कोणत्याही परिस्थितीत बाहेरील व्यक्तिस परवानगी दिली जाऊ नये.

४. होम डिलीव्हरी करणारे सर्व कर्मचाऱ्यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत व जो पर्यत लसीकरण होत नाही. तो पर्यत कोव्हिड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल २०२१ पासुन अंमलात येईल.

५. दि. १० एप्रिल २०२१ नंतर कोणताही कर्मचारी कोव्हिड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र/ लसीकरण केल्याशिवाय आढळल्यास त्याच्याकडुन रक्कम १०००/- दंड आणि संबंधित आस्थापनेकडुन रक्कम १०,०००/- दंड वसुल करण्यात यावा. या नियमाचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांची परवाने कोव्हिड-१९ ची सुचना असेपर्यत रद्द करण्यात येईल.

**१०. धार्मिक स्थळे :-**

१. सर्व धार्मिक स्थळे बंद राहतील.

२. सर्व धार्मिक स्थळांवर काम करणारे कर्मचारी, यांना दैनंदिन नित्यकर्मे करता येईल तथापि बाहेरील कोणत्याही व्यक्तीस आत परवानगी नसेल.

३.केंद्र शासनाच्या निकषानुसार धार्मिक स्थळांवर काम करणारे कर्मचारी, पुजारी, यांनी तातडीने लसीकरण करण्यात यावे. जेणे करुन सर्व धार्मिक स्थळे पुन्हा सुरु करण्याबाबत शासनास विचार करता येईल.

**११. सलुन / स्पा / ब्युटी पार्लर :-**

१. सर्व सलून / स्पा / ब्युटी पार्लर बंद राहतील.

२. भारत सरकारच्या निकषानुसार सलून / स्पा / ब्युटी पार्लर काम करणारे कर्मचारी कर्मचारी यांनी तातडीने लसीकरण करण्यात यावे. जेणे करुन सर्व सलून / स्पा / ब्युटी पार्लर पुन्हा सुरु करण्याबाबत शासनास विचार करता येईल.

**१२. वर्तमानपत्र :-**

१. वर्तमानपत्राची छपाई तसेच प्रसिध्दी केले जाऊ शकते.

२. सकाळी ७ ते रात्री ८ या दरम्यान वर्तमानपत्राची होम डिलिव्हरी करण्यास परवानगी असेल.

३. वर्तमानपत्राची होत डिलिव्हरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत व जोपर्यत लसीकरण होत नाही. तो पर्यत कोव्हिड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल २०२१ पासुन अंमलात येईल.

**१३. शाळा व महाविद्यालय:-**

१. सर्व शाळा व महाविद्यालये बंद राहतील.

२. हा नियम १० वी व १२ वीच्या परिक्षेसाठी शिथिल राहील. परिक्षेसाठी वापरले जाणारे सर्व कर्मचारी / शिक्षक यांनी लसीकरण करुन घेण्यात यावी किंवा कोव्हिड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (४८ तासापर्यत) सोबत ठेवणे बंधनकारक राहील.

३. राज्या बाहेरील कोणत्याही विद्यापीठ, मंडळ, किंवा प्राधिकरणाकडुन घेतल्या जाणाऱ्या परिक्षांसाठी महाराष्ट्रात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परवानगी देण्यात यावी.

४. सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद राहतील.

५. भारत सरकारच्या निकषानुसार शाळा/महाविद्यालयातील काम करणारे सर्व कर्मचारी, शिक्षक यांनी तातडीने लसीकरण करण्यात यावे. जेणे करुन सर्व शाळा/ महाविद्यालय पुन्हा सुरु करण्याबाबत शासनास विचार करता येईल.

**१४. धार्मिक, सामाजिक,राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रम :-**

१. सर्व धार्मिक, सामाजिक,राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रमास परवानगी नसेल.

२. लग्न समारंभासाठी जास्तीत जास्त ५० व्यक्तिस परवानगी देण्यात येत आहे.

अ) लग्नसमारंभाचा हॉल किंवा इतर कोणत्याही ठिकाणी लग्न असल्यास, तेथे काम करणा-या कर्मचा-यांनी लसीकरण करुन घेण्यात यावे. जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील.

ब) कोणताही कर्मचारी कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र / लसीकरण केल्याशिवाय आढळल्यास त्याच्याकडुन रक्कम रु.१,०००/- दंड आणि संबंधित आस्थापनेकडुन रक्कम रु. १०,०००/- दंडवसुल करण्यात यावा.

क) या नियमांचे वारंवार उल्लंघन करणा-या आस्थापना सील करण्यात येतील तसेच त्यांचे परवाने कोव्हिड-१९ ची सुचना असेपर्यंत रद्द करण्यात येतील.

३. अंत्ययात्रेसाठी २० व्यक्तीस परवानगी असेल. सर्व नातेवाईकांनी लवकरात लवकर लसीकरण करुन घेण्यात यावे किंवा निगेटिव्ह RTPCR प्रमाणपत्र सोबत बाळगावे.

४. सर्व धार्मिक स्थळांमध्ये नागरीकांना सद्या प्रवेश बंद करण्यात आलेला आहे. केवळ त्याठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे काम करण्यास मुभा देण्यात आली आहे. एखाद्या धार्मिक स्थळी विवाह किंवा अंत्यसंस्कार असेल तर शासनाने दि.०४ एप्रिल २०२१ रोजी दिलेल्या आदेशामध्ये घालुन दिलेल्या सर्व नियमांचे पालन करण्याच्या अटीवर परवानगी देण्याबाबत विचार करण्यात येईल. (दिनांक ०५/०४/२०२१ चे आदेश)

५. आठवडयाच्या शेवटी म्हणजे शनिवार आणि रविवारी विवाह समारंभ असेल तर सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ५ त्यासंदर्भात स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन योग्य वाटल्यास आणि शासनाचे कोवीड बाबतचे आदेश पालन करण्याच्या अटीवर परवानगी देईल.

**१५. रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेतेसाठी :-**

१. कोणत्याही प्रकारच्या खाद्य पदार्थ त्या स्थळी खाण्यास परवानगी नसेल. पार्सल व होम डिलीव्हरीसाठी दररोज सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत परवानगी असेल.

२. पार्सल घेण्यासाठी आलेल्या व प्रतिक्षेत असलेल्या ग्राहकांनी पुरेसे सामाजिक अंतर ठेऊन काऊंटर पासुन दुर उभे रहावे.

३. या नियमांचे उल्लंघन केल्यास, कोव्हिड-१९ संपेपर्यंत विक्रेत्यास बंदी घालण्यात येईल.

४. केंद्र शासनाच्या निकषानुसार सर्व खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी लवकारात लवकारात लवकर लसीकरण करावे व जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल, २०२१ पासुन अंमलात येईल.

५. सर्व सहा.आयुक्तांना सुचित करण्यात येत आहे की, कोणतेही खाद्य पदार्थ विक्रेते किंवा ग्राहकांनी नियमांचे उल्लंघन केल्यास, त्यांचेकडून दंड आकारण्यात यावा.

६. या नियमांचे वारंवार उल्लंघन केल्यास, त्या खाद्य पदार्थ विक्रेत्यावर तात्पुरत्या स्वरुपात किंवा कोव्हिड-१९ संपेपर्यंत बंदी घालण्यात येईल.

**१६. उत्पादन क्षेत्र :-**

१. उत्पादन क्षेत्र खालील अटींसह सुरु करण्यास परवानगी असेल.

२. उत्पादन क्षेत्र व कारखाने यांनी सर्व कामगारांचे शरीराचे तापमान दररोज तपासणी करणे.

३. केंद्र शासनाच्या निकषानुसार उत्पादन क्षेत्रात काम करणा-या सर्व कर्मचा-यांनी लवकरात लवकर लसीकरण करुन घेण्यात यावी.

४. एखादा कामगार / कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, त्याच्या संपर्कात आलेल्या सर्व कर्मचा-यांना वेतनासह क्वारंटाईन करण्यात यावे.

५. ५०० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व उत्पादन क्षेत्र व कारखाने यांनी स्वत:चे क्वारंटाईन सेंटर बनविण्यात यावे.

६. एखादा कामगार / कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, ते क्षेत्र पुर्णपणे सॅनिटाईज होईपर्यंत बंद ठेवण्यात यावे.

७. गर्दी टाळण्यासाठी दुपारचे जेवण व चहा ब्रेक टप्प्या टप्प्याने जाहीर करण्यात यावा.

८. सामान्य शौचालय वारंवार वारंवार सॅनिटाईज करण्यात यावे.

शहर महानगरपालिका (ठाणे)

९. केंद्र शासनाच्या निकषानुसार सर्व कर्मचा-यांनी लवकरात लवकर लवकारात लवकर लसीकरण करावे व जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल, २०२१ पासुन अंमलात येईल.

१०. एखादा कामगार / कर्मचारी पॉझिटीव्ह आढळल्यास, त्यास वैद्यकिय रजेवर जाण्याची परवानगी देण्यात यावी तसेच या कारणास्तव त्यांना कामावरुन काढण्यात येऊ नये. सदर कर्मचा-यास रजेच्या कालावधीचा संपुर्ण पगार देण्यात यावा.

**१७. ऑक्सिजन उत्पादक :-**

१. कोणत्याही औद्योगिक प्रक्रिया ज्यामध्ये कच्चा माल म्हणुन ऑक्सिजनचा वापर केला जातो. अशा प्रक्रियेस दि.१० एप्रिल, २०२१ पासुन परवानगी नसेल. कोणत्याही औद्योगिक क्षेत्रास ऑक्सिनची गरज नसल्यास, याबाबत संबंधित परवाना विभागाकडुन परवानगी घेण्यात यावी. सर्व संबंधित परवाना विभागाने ऑक्सिजनचा वापर करण्यात येणा-या औद्योगिक प्रक्रिया दि.१० एप्रिल,२०२१ पर्यंत बंद होतील किंवा परवानगी घेऊन काम सुरु ठेवतील, याची खातरजमा करावी.

२. सर्व ऑक्सिजन उत्पादकांनी ८० टक्के वैद्यकिय सेवा किंवा औषधी उद्देशासाठी राखुन ठेवण्यात यावे. सर्व उत्पादकांनी आपल्या ग्राहकांना दि.१०एप्रिल,२०२१ नंतर ऑक्सिजनचा वापर टाळण्यासाठी सांगण्यात यावे.

**१८. ई-कॉमर्स :-**

१. ई-कॉमर्स कर्मचा-यांनी केंद्र शासनाच्या निकषानुसार लवकरात लवकर लवकारात लवकर लसीकरण करावे व जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल, २०२१ पासुन अंमलात येईल.

२. वारंवार नियमांचे उल्लंघन करणा-यांवर त्यांचा परवाना कोव्हिड-१९ संपेपर्यंत रद्द केला जाऊ शकतो.

**१९. सहकारी गृहनिर्माण संस्था :-**

१. कोणतीही गृह निर्माण संस्था ज्यामध्ये अधिक सक्रिय कोरोना पॉझिटिव्ह केस असतील त्या सर्व सहकरी गृह निर्माण संस्था सुक्ष्म कंटेनमेंट झोन मानली जातील.

२. अशा सर्व गृह निर्माण संस्थांनी आपल्या सोसायटी बाहेर माहीती बोर्ड लावुन अभ्यंगतास प्रवेश नाकारावा.

३. सुक्ष्म कंटेनमेंट झोनमध्ये आत येणारे व बाहेर जाणारे व्यक्ती यावर संबंधित गृह निर्माण संस्थेने निर्बंध ठेवावे.

४. कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाल्यास सदर गृह निर्माण संस्थेस रु.१०,०००/- दंड आकारला जाईल. तसेच याची पुनरावृत्ती झाल्यास, जास्त दंड आकारला जाऊ शकतो.

५. सर्व गृह निर्माण संस्थांना सुचित करण्यात येत आहे की, सोसायटीमध्ये दररोज येणा-या व्यक्तींची लसीकरण होईपर्यंत चाचणी करण्यात यावी.

**२०. बांधकाम विषयक कामकाज :-**

१. ज्या साईटवर कामगार राहत आहेत फक्त अशा बांधकाम साईटना परवानगी देण्यात येत आहे. मटेरियलची ने-आण वगळता बाहेरील सर्व हालचाल टाळण्यात यावी.

२. बांधकाम साईटवर काम करणा-या सर्व कामगार / कर्मचा-यांनी केंद्र शासनाच्या निकषानुसार लवकारात लवकर लसीकरण करावे व जोपर्यंत लसीकरण होत नाही, तोपर्यंत कोव्हीड-१९ निगेटिव्ह प्रमाणपत्र (केवळ १५ दिवस वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील. हा नियम १० एप्रिल, २०२१ पासुन अंमलात येईल.

३. कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास सदर बांधकाम विकासकास रु.१०,०००/- दंड आकारला जाईल. तसेच याची पुनरावृत्ती झाल्यास, कोव्हिड-१९ संपेपर्यंत संबंधित बांधकाम साईट बंद करण्यात येईल.

४. एखादा कामगार / कर्मचारी पॉझिटीव्ह आढळल्यास, त्यास वैद्यकिय रजेवर जाण्याची परवानगी देण्यात यावी तसेच या कारणास्तव त्यांना कामावरुन काढण्यात येऊ नये. सदर कर्मचा-यास रजेच्या कालावधीचा संपुर्ण पगार देण्यात यावा.

**२१. शास्ती :-**

१. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या दि.३१ मार्च,२०२१ च्या आदेशास अनुसरुन सर्व शास्ती आकारण्यात येतील.
२. आकारण्यात आलेल्या सर्व शास्ती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोव्हिड -१९ चे प्रादुर्भाव कमी करण्यासाठी वापर करण्यात येईल.

उक्त आदेशाची काटेकोर अंमलबाजवणी सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांनी करावयाची आहे. सदरहु आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुद्ध यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

स्वा/-
**(डॉ.पंकज आशिया)**
**आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

**प्रत :** मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा. विरोध पक्ष नेता.
अतिरिक्त आयुक्त

**प्रत: पुढिल आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

१. पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ-२)
२. उप-आयुक्त (मुख्या.).
३. उप-आयुक्त (सार्व.आरोग्य).
४. उप-आयुक्त (वैद्यकिय आरोग्य).
५. उप-आयुक्त (सुरक्षा)
५. सहा. आयुक्त (सर्व).
६. संबंधित अधिकारी व कर्मचारी
७. विभागप्रमुख व खातेप्रमुख (सर्व) यांजकडे माहीतीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८. जनसंपर्क अधिकारी / संगणक विभागप्रमुख प्रसिद्धिसाठी.

**(ओमप्रकाश दिवटे)**
**अतिरीक्त आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**